सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील बृहन्मुंबईतील शासकीय निवासस्थानांचे वाटप तसेच अनुषंगीक बाबीसंदर्भातील सुधारीत तरतूदी.......

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः शानिवा-१५१८/प्र.क्र.४६१/२३-अ
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२.
तारीखः- २९ मार्च, २०१९

वाचा -

१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. शानिवा-१५०९/प्र.क्र.३२०/०९/२३-अ, दि. १९ एप्रिल,२०११
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. शानिवा-२५११/प्र.क्र.२३१/११/२३-अ, दि.२९ जुलै,२०११
३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.शानिवा-१५११/प्र.क्र.१७७/११/२३-अ, दि.०५ ऑक्टोबर,२०१२
३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.शानिवा-१५११/प्र.क्र.१४८/११/२३-अ, दि.३० डिसेंबर,२०१४
४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.शानिवा-१५१३/प्र.क्र.३४६/१३/२३-अ, दि.०१ जुलै,२०१५
५) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.शानिवा-१५१३/प्र.क्र.३४६/१३/२३-अ, दि.१० जुलै,२०१५
६) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.शानिवा-२५१७/प्र.क्र.३३/२३-अ, दि.३० ऑगस्ट,२०१८

प्रस्तावना -

सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील बृहन्मुंबईतील शासकीय निवासस्थानांचे वाटप तसेच अनुषंगीक बाबींच्या अनुषंगाने उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयांत नमूद काही तरतूदी सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः -

सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील बृहन्मुंबईतील शासकीय निवासस्थानांचे वाटप तसेच अनुषंगीक बाबींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारीत तरतूदी लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे:-

१) सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील शासकीय निवासस्थान वाटप केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी सेवानिवृत्ती/बृहन्मुंबईबाहेर बदली झाल्यानंतर तीन महिन्यांमध्ये निवासस्थान रिक्त करणे अनिवार्य आहे. तीन महिन्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

२) उपरोक्त अनु.क्र.१ येथे नमूद सर्व अधिकारी/कर्मचा-यांनी सेवानिवृत्ती/बृहन्मुंबईबाहेर बदली झाल्यानंतर शासकीय निवासस्थानातील वास्तव्याचा तीन महिन्यांचा अनुज्ञेय कालावधी संपल्यानंतरही शासकीय निवासस्थान रिक्त न केल्यास संबंधित कार्यकारी अभियंता यांचेमार्फत सदर निवासस्थान सक्तीने रिक्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३) बृहन्मुंबईबाहेर बदली झाल्यावर शासकीय निवासस्थानातील वास्तव्याच्या अनुज्ञेय कालावधीनंतर शासकीय निवासस्थान रिक्त करणे आवश्यक राहील. शासकीय निवासस्थान रिक्त केले नाही तर ती गैरवर्तणूक ठरेल व त्यानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र असल्याचे समजून त्याच्याविरुध्द नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल. तसेच सेवानिवृत्तीनंतर अनुज्ञेय कालावधीत निवासस्थान रिक्त केले नाही तर शासकीय निवासस्थानाच्या अनुषंगाने असलेल्या थकित रकमांचे समायोजन व वसूली शासन निर्णय,वित्त विभाग दि.१६.०२.२०१३ मधील तरतूदीनुसार संबंधीत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या रोखून ठेवण्यात आलेल्या उपदानाच्या १०% रकमेमधून करण्याबाबत संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी करावी. तसेच

शासकीय निवासस्थानाच्या अनुषंगाने थकीत रकमेच्या वसूलीबाबत वित्त विभागाने वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४) बृहन्मुंबईत कार्यरत भाप्रसे/भापोसे व न्यायीक अधिकारी यांनी शासकीय निवासस्थान मिळण्याकरीता ऑनलाईन प्रणालीवर अर्ज केल्यानंतर त्यांना त्यांच्या ग्रेड पे नुसार अनुज्ञेय असलेल्या निवासस्थानाचे वाटप विभागस्तरावर प्राधान्याने करण्यात येईल.

५) भाप्रसे/भापोसे अधिका-यांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या निवासस्थानापेक्षा वरिष्ठ टप्प्यातील निवासस्थानाची मागणी केल्यास अशाप्रकारचे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

६) सेवानिवृत्तीनंतर विविध आयोग/प्राधिकरणे/न्यायाधिकरणे यांच्या आस्थापनेवर पुनर्नियुक्त होणा-या प्रशासकीय/न्यायीक सेवांमधील अधिका-यांना त्यांच्या नियुक्तीच्या पदावरील वेतनश्रेणी/ग्रेड वेतन विचारात घेऊन त्यानुसार अनुज्ञेय ठरणाऱ्या शासकीय सेवा निवासस्थानांचे वाटप करण्यात येईल. तथापि, जर पुनर्नियुक्ती झालेल्या पदावर कोणतीही विशिष्ट अशी वेतनश्रेणी/ग्रेड वेतन विहित करण्यात आलेली नसेल, तर संबंधीत अधिकारी, त्यांच्या सेवानिवृत्तीच्या लगतपूर्वी ज्या पदावर कार्यरत असतील त्या पदास अनुज्ञेय असलेली वेतनश्रेणी/ग्रेड वेतन विचारात घेऊन त्यानुसार अनुज्ञेय ठरणा-या निवासस्थानाचे वाटप करण्यात येईल. तसेच पुनर्नियुक्तीचे पद कनिष्ठ वेतनश्रेणीचे किंवा ग्रेड पे चे असेल तर अशा प्रसंगी त्या पदास अनुज्ञेय असलेल्या निवासस्थानाचे वाटप करण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९११०२३२१७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjana Pradeep Khopde

Digitally signed by Sanjana Pradeep Khopde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=162267a166279e51cd3f1cc6e10b61ce9868a859260375a1bba3e5f88931d998, cn=Sanjana Pradeep Khopde
Date: 2019.03.29 11:04:22 +05'30'

(श्रीम. सं. प्र. खोपडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. उपाध्यक्ष विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९. मा. उप सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
१०. मा. विरोधी पक्षनेता, (विधान सभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
११. मा. विरोधी पक्षनेता. (विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
१२. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१५. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१६ महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
१७ प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१८ प्रबंधक, अपिलेट शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२०. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.
२१. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -३२.
२२. सर्व मंत्रालयीन विभाग.
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२४. कार्यकारी अभियंता (सा.बां.), इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-०१.
२५ कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, २ रा मजला, अंधेरी (प.),मुंबई-४०० ०५८
२६ कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०१८.
२७. कार्यकारी अभियंता,इमारती बांधकाम विभाग,कामगार हॉस्पिटल आवार,मुलुंड (प),मुंबई-४०० ०८०.
२८. उप अभियंता, पश्चिम (सा.बां.) उप विभाग, मलबार हिल, मुंबई- ४०००६.
२९. उप अभियंता, दक्षिण (सा.बां.)उप विभाग, एम.टी.डी.सी. कार्यालयासमोर, मुंबई- ४०००२०.
३०. उप अभियंता, मध्य (सा.बां.)उप विभाग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.
३१. सामान्य प्रशासन विभाग/का.क्र.१८, २१, २२ व ३१ (राजशिष्टाचार) मंत्रालय, मुंबई
३२. निवड नस्ती.